क्रमांक : ४६ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : **१ जानेवारी, २०२१**

प्रेषक :

सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ रोजीपासून** सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच **प्रश्न** सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी बाबी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **शुक्रवार, दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी** ई-मेलद्वारे पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आला आहे. **(प्रत सोबत जोडली आहे)**

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार **पहिल्या टप्प्यासाठी** मा.सदस्यांकडून प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना **सोमवार, दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल. **संसदीय कार्य विभागाने चार आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एक आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दर्शविण्यात येत आहे.**

सोमवार, दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१** रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत या सचिवालयातील विधानपरिषद प्रश्न (ई-१) कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( जयवंत राणे )**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,**
**विधान भवन, मुंबई-४०० ०३२.**

D:\(3) Buletin Part 2.doc

महाराष्ट्र विधानपरिषद क्रमांक : १

पत्रक भाग-दोन

शुक्रवार, दिनांक १ जानेवारी, २०२१/पौष ११, १९४२ (शके)

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक खालील विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेत दर्शविण्यात आलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ ते ५ )**

**सोमवार, दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी स्वीकारण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे मा.सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल.**

सदरहू बॅलट प्रसंगी उपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फेऱ्यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) घेण्यात येईल व सदर बॅलटसाठी प्रश्न सूचना दिलेल्या मा.सदस्यांपैकी अनुपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट अशाच प्रकारे पाच फेऱ्यांमध्ये तद्नंतर लगेच घेण्यात येईल. **सदर बॅलटकरिता अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांचे, त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींकडून किंवा अन्य सदस्यांकडून प्राधिकारपत्र (Authority Letter) स्वीकारण्यात येणार नसल्याचा निर्णय झालेला आहे.**

**सदरहू बॅलटसाठी उपस्थित राहणाऱ्या मा.सदस्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता मिळणार नाही.**

**तसेच बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजीपासून स्वीकारण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्न सूचना स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही करण्यासाठी QIS या संगणकीय प्रणालीचा वापर होत असून मा.सदस्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील.**

**विवरणपत्र**

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | सोमवार, दिनांक ०८ मार्च, २०२१<br>सोमवार, दिनांक १५ मार्च, २०२१<br>सोमवार, दिनांक २२ मार्च, २०२१ | शुक्रवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१<br>गुरुवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ |

..२/-

| | | | |
|---|---|---|---|
| दोन | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | मंगळवार, दिनांक ०२ मार्च, २०२१<br>मंगळवार, दिनांक ०९ मार्च, २०२१<br>मंगळवार, दिनांक १६ मार्च, २०२१<br>मंगळवार, दिनांक २३ मार्च, २०२१<br>*मंगळवार, दिनांक ३० मार्च, २०२१ | शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी, २०२१<br>शुक्रवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१<br>गुरुवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१<br>*शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१<br>बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१<br>बुधवार, दिनांक १७ मार्च, २०२१<br>बुधवार, दिनांक २४ मार्च, २०२१<br>*बुधवार, दिनांक ३१ मार्च, २०२१ | शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी, २०२१<br>शुक्रवार, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१<br>गुरुवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१<br>*शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ |
| चार | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री | गुरुवार, दिनांक ०४ मार्च, २०२१<br>गुरुवार, दिनांक १८ मार्च, २०२१<br>गुरुवार, दिनांक २५ मार्च, २०२१<br>*गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०२१ | सोमवार, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१<br>सोमवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१<br>सोमवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१<br>*सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ |
| पाच | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(३) ऊर्जा मंत्री<br>(४) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री<br>(६) आदिवासी विकास मंत्री<br>(७) सहकार, पणन मंत्री<br>(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, दिनांक ०५ मार्च, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२१<br>शुक्रवार, दिनांक १९ मार्च, २०२१<br>शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ | मंगळवार, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२१<br>मंगळवार, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२१<br>मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१<br>मंगळवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवडयाच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १ जानेवारी, २०२१

राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
(४) संगणक कक्ष / MKCL कक्ष

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) माहिती तंत्रज्ञान विभाग
(३) माहिती व जनसंपर्क विभाग
(४) विधी व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

(२) **श्री. अजित अनंतराव पवार ---- उप मुख्यमंत्री**

वित्त व नियोजन विभाग

(३) **श्री. सुभाष राजाराम देसाई ---- उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग व खनिकर्म विषयक बाबी)
(२) मराठी भाषा विभाग

(४) **श्री. अशोक शंकरराव चव्हाण ---- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(५) **श्री. छगन चंद्रकांत भुजबळ ---- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(६) **श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील ---- कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
(२) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

(७) **श्री. जयंत राजाराम पाटील ---- जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**

जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग (खार जमिनी विषयक बाबी वगळून)

(८) **श्री. अनिल वसंतराव देशमुख ---- गृह मंत्री**

गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विषयक बाबी वगळून)

(९) **श्री. विजय *ऊर्फ* बाळासाहेब भाऊसाहेब थोरात ---- महसूल मंत्री**

महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)

(१०) **डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे ---- अन्न व औषध प्रशासन मंत्री**

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

(११) **श्री. राजेश अंकुशराव टोपे ---- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

(१२) **श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक ---- अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री**

(१) अल्पसंख्यांक विकास विभाग (अल्पसंख्यांक विकास व वक्फ विषयक बाबी)
(२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

(१३) **श्री. हसन मियालाल मुश्रीफ ---- ग्रामविकास मंत्री**

ग्रामविकास विभाग

(१४) **डॉ. नितिन काशिनाथ राऊत ---- ऊर्जा मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

..४/-

(१५) **श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड ---- शालेय शिक्षण मंत्री**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)

(१६) **डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड ---- गृहनिर्माण मंत्री**

गृहनिर्माण विभाग

(१७) **श्री. एकनाथ संभाजी शिंदे ---- नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**

(१) नगर विकास विभाग

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

(१८) **श्री. सुनिल छत्रपाल केदार ---- पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

(१) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विषयक बाबी)

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)

(१९) **श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार ---- इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

(२) जलसंपदा विभाग (खार जमिनी विकास विषयक बाबी)

(३) महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विषयक बाबी)

(२०) **श्री. अमित विलासराव देशमुख ---- वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री**

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)

(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

(२१) **श्री. उदय रविंद्र सामंत ---- उच्च व तंत्रशिक्षण मंत्री**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

(२२) **श्री. दादाजी दगडू भुसे ---- कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री**

(१) कृषी व फलोत्पादन विभाग (कृषी विषयक बाबी)

(२) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिक कल्याण विषयक बाबी)

(२३) **श्री. संजय दुलीचंद राठोड ---- वने, भूकंप पुनर्वसन मंत्री**

महसूल व वन विभाग (वने व भूकंप पुनर्वसन विषयक बाबी)

(२४) **श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील ---- पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२५) **ॲड. के.सी. पाडवी ---- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

(२६) **श्री. संदिपानराव आसाराम भुमरे ---- रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**

(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)

(२) कृषी व फलोत्पादन विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

(२७) **श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील ---- सहकार, पणन मंत्री**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार, पणन विषयक बाबी)

..५/-

**(२८) ॲड. अनिल दत्तात्रय परब ---- परिवहन, संसदीय कार्ये मंत्री**

(१) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)

(२) संसदीय कार्य विभाग

**(२९) श्री. अस्लम रमजान अली शेख ---- वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री**

(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)

(२) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)

(३) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)

**(३०) ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे) ---- महिला व बालविकास मंत्री**

महिला व बालविकास विभाग

**(३१) श्री. शंकरराव यशवंतराव गडाख ---- मृद व जलसंधारण मंत्री**

मृद व जलसंधारण विभाग

**(३२) श्री. धनंजय पंडितराव मुंडे ---- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**(३३) श्री. आदित्य उध्दव ठाकरे ---- पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री**

(१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)

(२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

(३) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)